# संदर्भग्रंथ सूची

# संदर्भग्रंथ सूची


D'souza, A. L. (1985), article on "The International Drinking Water Supply and Sanitation Decade" is published inYojana, June 1st, Vol. 15, 1985, p. 16-17

Government of India (2002) : "Water Supply and Sanitation in India", Country Report prepared by the Planning Commission, downloaded from the website: http.www. planning commission.nic.in

Government of India (2003) : "Towards Total Sanitation and Hygine : A Challenges for India", Country Paper, South Asian Conference on Sanitation, Dhaka, Bangladesh, held during 21st to 23rd October 2003, downloaded from the website of Department of Water supply and Sanitation, Governmetn of India.

Government of Maharashtra, "Jalaswaraj : Pure Water and Clean Vilalge" (in Marathi), A booklet published by the Department of Water Supply and Sanitation, Mumbai

Government Resolution (2000), Water Supply and Sanitation Department No. Campaign-2000/CR 427/WS-16 dated 15 September

Government Resolution (2001), Water Supply and Sanitation Department No. Campaign-2000/CR 440/WS-16 dated 31 March

Government Resolution, Water Supply and Sanitation Department No. RSP-1096/CR 8/4 1B dated 22 January 1996

Santhanam, M. L. (1989), article published in 'Social Change', March, Vol. 19, No. 1

पाटील, सुलोचना (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : मजरे-कार्वे (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गवळी राजश्री, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : आमशी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डिगरे स्वाती, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : बहिरेवाडी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

रामपूरे शीला, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कवठेपिरान (ता. मिरज, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिरगे मालती, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : अंकलखोप (ता. पलूस, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वायदंडे जगुबाई, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : धामणेर (ता. कोरेगाव, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सुतार मनिषा, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : बाळेघोल (ता. कागल, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पोवार निलम, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : पाटेकरवाडी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यादव धनाजी, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कुंभारवाडी (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जोई रामचंद्र, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : गिजवणे (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुजारी सविता, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : शिवणगे (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चव्हाण राज, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : पाचगाव (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कावरे अनिता, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : उजनी (ता. माढा, जि. सोलापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कांबळे सीमा, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कांबळवाडी (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत कोरेगाव, ता. वाळवा, जि. सांगली

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

# परिशिष्ट - ब

## परिशिष्ट - ब

स्वच्छता अभियानांतर्गत केलेल्या कामगिरीच्या मुल्यमापनाचे निकष व त्या अनुषंगाने द्यावयाचे गुण

| अ.क्र. | विषय | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| मुद्दा क्र. १ | पाणी व्यवस्थापन | ३० | |
| मुद्दा क्र. २ | सांडपाणी व्यवस्थापन | १५ | |
| मुद्दा क्र. ३ | शौचालय व्यवस्थापन | ३० | |
| मुद्दा क्र. ४ | घनकचरा व्यवस्थापन | २० | |
| मुद्दा क्र. ५ | घर / गाव परिसर स्वच्छता | २० | |
| मुद्दा क्र. ६ | वैयक्तीक स्वच्छता | १० | |
| मुद्दा क्र. ७ | आरोग्य, शैक्षणिक व लोकशिक्षण | १० | |
| मुद्दा क्र. ८ | अपारंपारीक उर्जा व्यवस्थापन | १५ | |
| मुद्दा क्र. ९ | कुटुंबकल्याण | २० | |
| मुद्दा क्र. १० | लोकसहभाग | २५ | |
| मुद्दा क्र. ११ | सामुहिक स्वयंपुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रम | ५ | |
| | **एकूण गुण** | २०० | |

| | विषय | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | **पाणी व्यवस्थापन** **एकूण गुण** | **३०गुण** | |
| **१** | **जलस्त्रोतांचे सर्वेक्षण, नोंदणी व नियोजन** **एकूण** | ५ | |
| अ) | ग्रामपंचायतीतील सर्व पिण्याच्या सार्वजनिक स्त्रोतांचे सविस्तर सामूहिक सर्वेक्षण केले असल्यास व तसा रेकॉर्ड ग्रामपंचायतीत उपलब्ध असल्यास (विहिरी, हातपंप, विद्युतपंप, गावतळी, झरे व इतर सर्व सार्वजनिक स्त्रोत) | १ | |
| ब) | सर्वेक्षणाची व जलस्त्रोतांची माहिती संपूर्ण गावाला आहे याची खात्री झाल्यास (चमूतील प्रत्येक सदस्याने किमान १ महिला, युवक, विद्यार्थी / विद्यार्थीनी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्राम पाणी पुरवठा सदस्य यांच्याशी वार्तालाप करुन प्रश्न विचारून तपासून जाणून घ्यावे व नंतरच गुण द्यावे) | १ | |
| क) | गावाने ग्रामसभेमार्फत पाण्याची एकूण उपलब्धता व गरज यांचे विश्लेषण करुन पाण्याची कमतरता/वापर निश्चित केला असल्यास (Water Accounting) व तसा रेकॉर्ड उपलब्ध असल्यास व तो ग्रामपंचायतीत/ गावात इतरत्र लोकांसाठी फलकावर/भिंतीवर लावला असल्यास | २ | |
| ड) | सर्व सार्वजनिक जलस्त्रोत, हातपंप, पॉवरपंप नळ पाणी पुरवठा योजनांची मालमत्ता (एका गावाची योजना असल्यास) ही , सरकार दप्तरी, तलाठी रेकॉर्ड व ग्रामपंचायत मालमत्ता वहीत ग्रामपंचायतीच्या नांवे नोंदविली असल्यास व गावाने त्याची जबाबदारी स्विकारली असल्यास (ही गावात महत्वाच्या ठिकाणी गावक-यांना लिहून उपलब्ध केली असल्यास) | १ | |
| .२ | **पाणी वाटपाचे सामूहीक नियोजन व नियमन** **एकूण** | ५ | |
| अ) | गावात **पाणी टंचाई** असल्यास (दरडोई २० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्ध असल्याने कोणतीही टंचाई उपययोजना गावात घेतली गेली असल्यास) गावातील सार्वजनिक | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | स्त्रोतापासून ५०० मिटरच्या आतील खाजगी विहीरी, स्त्रोत यावर ग्रामसभेने बंधने आणण्याचा ठराव केला असेल व तो प्रत्यक्ष पाळला जात आहे याची तपासणी चमूची खात्री झाल्यास (सार्वजनिक स्त्रोताच्या आजूबाजूची माहिती घेवून चमूने ठरविणे हे काम चमूतील संबंधित तज्ञ व्यक्तीला विशेषत्वाने तपासण्यास देवून नंतर इतरांनी random पध्दतीने तपासून घेणे)<br>अथवा<br>गावात पाणी टंचाई नसल्यास (दरडोई ४० लिटर पेक्षा जास्त पाणी उपलब्ध असल्यास) सर्व भागात समान पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेली उपायोजना व न्याय पाणीवाटप | | |
| ब) | एकत्रित पाणी व्यवस्थापनासाठी गावाने पीक पध्दतीवर ग्रामसभेमार्फत स्वयंनिर्णयातून बंधने आणून तिचे पालन होत असल्यास (गावाची एकत्रित पाणी व्यवस्थापनाची जाण व आत्मीयता पहावी.) | १ | |
| क) | विंधन विहिरीच्या खोलीवर/ विंधन विहीरी, पिण्याचे पाणी वगळता इतर बाबींसाठी प्रत्यक्ष घेण्यावर, गावाने गरजेनुसार स्वयंबंधने आणली असल्यास व पालन होत असल्यास | १ | |
| ड) | गावातील सार्वजनिक स्त्रोतांच्या पुनर्भरणासाठी केलेली एकुण उपाययोजना (पारंपारीक + अपारंपारीक पध्दती विचारात घेवून गुण देणे) | २ | |
| **१.३** | **पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल/दुरुस्ती एकूण** | ५ | |
| अ) | शासनाच्या किमान दरापेक्षा जादा दराने (संपूर्ण देखभाल दुरुस्ती खर्च + sinking fund विचारात घेवून ) पाणी पट्टी लावली असल्यास (नळकोंडाळ्याचा किमान दर प्रतिकुटूंब रु.७५ प्रतिवर्ष व घरगुती जोडणी रु.३६० प्रतिवर्ष) | १ | |
| ब) | पाणीपट्टी वसुली (नोव्हेंबर ६०%, डिसेंबर ७५%, जानेवारी १००%)<br>१००% असल्यास - २ गुण<br>९०% असल्यास - १ ½<br>८०% असल्यास - १ गुण<br>७०% असल्यास - १/२ गुण<br>७०% पेक्षा कमी असल्यास - ० गुण<br>(अ चा विचार करून ब पैकी गुण देणे) | २ | |
| क) | देखभाल दुरुस्ती नियमित होण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षित कर्मचारी अथवा प्रशिक्षण देवून सेवाभावी व्यक्तीची नेमणूक केली असल्यास अथवा इतर प्रभावी व्यवस्था केली असल्यास | १ | |
| ड) | पाणी पुरवठा निधीचे व देखभाल दुरुस्तीचे संपूर्ण रेकॉर्ड / दप्तर हिशोब अद्ययावत ठेवले असलेस (चमूने दप्तर सविस्तर तपासून गुण देणे) | १ | |
| **१.४** | **पाण्याचा पुनर्वापर, बहुवापर व शुध्दता यासाठी उपाययोजना एकूण** | १० | |
| अ) | साध्या विहीरी , नळकोंडाळे, हातपंप ,प्लॅटफॉर्म, विद्युतपंप येथील वाहून जाणारे पाणी प्लॅटफॉर्म पूर्ण स्वच्छ ठेवून ते अद्यायावत बांधले असल्यास (अद्ययावत व्यवस्था असलेल्या पाणी पुरवठ्याच्या जागा ÷ एकूण पाणी पुरवठ्याच्या जागा) X १ | १ | |
| ब) | वरील पाणी गुरांसाठी, वृक्षांना वापरुन त्याचा पुनर्वापर करण्याची शास्त्रीय पध्दत अवलंबिली असल्यास व कुठेही पाणी अनावश्यक वाहत नसल्यास (सर्व स्त्रोतांचा विचार करुन त्याप्रमाणात गुण देणे)<br>(एकूण सोय केलेले स्त्रोत ÷एकूण सार्वजनिक स्त्रोत) X २ | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | टी.सी.एल. पावडरचा अथवा हायपोचा नियमित वापर (स्टॉक रजिस्टर, प्रत्यक्ष टेस्ट करून प्रश्न विचारून गुण देणे) अनियमित वापर आढळून आल्यास १ गुण, वापर नसल्यास ० गुण | २ | |
| ड) | गेल्या ३ वर्षात गावात कोणतीही साथ आली नसल्यास व कोणताही जलजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला नसल्यास (वैद्यकीय अधिकारी यांचा दाखला व प्रत्यक्ष विचारणा करून गुण देणे )<br>३ वर्षे - २ गुण<br>२ वर्षे- १ गुण<br>१ वर्ष -१/२ गुण<br>२ वर्षापेक्षा कमी - ० गुण | २ | |
| इ) | प्रयोग शाळेत पाणी नमूने नियमित तपासणी (रासायनिक प्रदुषण) करुन त्याचा अहवाल ठेवला असल्यास (अहवाल तपासून त्यावर केलेली कार्यवाही पहावी) | १ | |
| फ) | कपडे धुण्यासाठी, भांडी घासण्यासाठी केलेली विशेष स्वतंत्र सार्वजनिक व्यवस्था (गावातील लोकसंख्या पाहून गुण देणे) | १ | |
| ग) | रासायनिक प्रदुषित पाण्याचा इतर घरगुती वापर व शुध्द पाण्याचा पिण्यासाठी/ स्वयंपाकासाठी, या दृष्टीने पुर्नवापरासाठी ठोस उपाययोजना केली असल्यास<br>**<u>किंवा</u>**<br>रासायनिक प्रदुषण नसले तरीसुध्दा पाऊस पाणी संकलनाचे द्वारे सार्वजनिक इमारतीवरील पाणी संकलन करून वापर केला असल्यास | १ | |
| **१.५** | **विशेष योजना अंतर्गत गावाने केलेली कामगिरी एकूण** | ५ | |
| अ) | शिवकालीन पाणी साठवण योजने अंतर्गत सामूहिक नियोजन करुन लोकसहभागातून कामे केली असल्यास (कामाचे प्रमाण, स्तर, सहभाग, कामांची उपयुक्तता पाहून गुण देणे) | २ | |
| ब) | महात्मा फुले जलभूमी अभियान अंतर्गत लोकसहभागातून कामे केली असल्यास | २ | |
| क) | इतर पाणी साठवण, वापर, पुनर्वापर व शुध्दीकरण यासाठी स्थानिक पुढाकारातून गावाने काही विशेष कामगिरी केली असल्यास ( यशवंत ग्राम समृध्दी योजना इ.व्दारे) | १ | |
| **२** | **मुद्दा क्रमांक - सांडपाणी व्यवस्थापन एकूण गुण** | **१५** | |
| **२.१** | **सांडपाणी संकलन व्यवस्था एकूण** | ८ | |
| अ) | गावातील शोषखड्डे व्यवस्था (जेथे गटार व्यवस्थेची गरज नाही अशा भागात पूर्णतः असल्यास, घरे संख्या व शोषखड्डे प्रमाण (गटार व्यवस्थेस जोडलेली घरांची संख्या सोडून गुण देणे)<br>(एकूण शोषखड्डे ÷ शोषखड्डे आवश्यकता) X २ | २ | |
| ब) | गावातील गटार व्यवस्था - उघडी व बंद (एकूण व्यवस्थेच्या प्रमाणात गुण देणे)<br>टीपः- वरील २.१ मधील अ व ब चा एकत्रित विचार करून गावात कोठेही सांडपाणी वाहत नाही याची खात्री करून एकूण ४ पैकी गुण देणे. | २ | |
| क) | गावातील गटार व शोषखड्डे याची निगा, स्वच्छतेचा स्तर, शास्त्रीय व्यवस्था | १ | |
| ड) | शासन योजनेतून संपूर्ण मदत न घेता कमी खर्चात ,श्रमदान ,लोकसहभागातून शोषखड्डे,गटारे यांची बांधकामे करुन स्वयंनिधीतून चांगली निगा ठेवली असल्यास | १ | |
| इ) | गावाने इतर नाविन्यपूर्ण पध्दती वापरुन प्रभावी सांडपाणी संकलन व्यवस्था उभारली असल्यास (नाविन्यपूर्ण बाबी नमूद कराव्यात) | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| •.२ | **सांडपाणी निर्मूलन, प्रक्रीया व वापर व्यवस्थापन** **एकूण** | ७ | |
| अ) | नळकोंडाळे, धोबिघाट इत्यादी ठिकाणचे अंतिम सांडपाण्याचा उपयोग शेती परसबाग, यासाठी शास्त्रीयदृष्ट्या पूर्णत: केला असल्यास | २ | |
| ब) | शोषखड्डे, गटारे यांचे पाण्याच्या स्त्रोतापासूनचे (हातपंप, विहीरी, नळ लाईन्) अंतर, योग्य राखले असून (३ मिटरपेक्षा जास्त) कुठेही गळती नसल्यास व सदर पाणी व सांडपाणी कुठेही एकत्रित होत नसल्याची खात्री झाल्यास (प्रत्यक्ष पहाणी करून गुण देणे) | २ | |
| क) | सांडपाण्याचे आवश्यक तेवढे शुध्दीकरण करुन त्याचा पुनर्वापर होत असल्यास (केवळ गावाबाहेर काढले असून त्याचा उपयोग होत नसल्यास याखाली गुण देवू नये) | १ | |
| ड) | सांडपाण्याच्या वापरातून ग्रामपंचायतीस काही आर्थिक उत्पन्न होत असल्यास व सांडपाण्याचा उपयोगामुळे एकूण गावातील भाजीपाला, शेतीमाल इत्यादीचे उत्पन्न वाढले असल्यास (प्रत्यक्ष पहाणी, चर्चा, गावास्तर अधिका-यांकडून माहिती घेणे) | २ | |
| ३ | **शौचालय व्यवस्थापन** **एकूण गुण** | ३० | |
| •.१ | **शौचालय व्यवस्था** **एकूण** | १५ | |
| अ) | गावातील सर्व कुटुंबाकडे **वैयक्तीक शौचालयाची** व्यवस्था असल्यास - १० गुण<br>किंवा<br>गावातील किमान ५०% कुटुंबाकडे **वैयक्तीक शौचालय व्यवस्था** व इतर सर्व कुटुंबांकडून **सामूहिक शौचालयाचा वापर** अशा पध्दतीने गावात सर्व कुटुंबाकडे शौचालय व्यवस्था केली असल्यास - ९ गुण<br>(टीप.- **सामूहिक शौचालय** म्हणजे काही कुटुंबानी एकत्र येऊन शौचालय बांधून त्याचा वापर करीत असल्यास, अशा एका सामूहिक शौचालयाचा उपयोग ठरविण्यासाठी एकाच वाडीतील अथवा लगतच्या घरातील **कमाल** ५ कुटुंबे किंवा २५ व्यक्ती विचारात घ्याव्यात. मात्र प्रत्यक्ष तपासणी करुन पडताळणी घ्यावी. जसे प्रत्येक कुटुंबाकडे स्वतंत्र किल्ली आहे का? इ.)<br>किंवा | १० | |
| | ५०% कुटुंबाकडे **वैयक्तिक शौचालये**, २५% कुटुंबाकडे **सामुहिक शौचालये** व उर्वरित २५% कुटुंबासाठी **सार्वजनिक शौचालय** व्यवस्था असल्यास - ८ गुण<br>(टीप:- सार्वजनिक शौचालयासाठी १ सीटसाठी ५ कुटुंब किवा २५ व्यक्ती हे प्रमाण धरून एकुण उपलब्ध शौचालयाचे प्रमाण ठरवावे)<br>किंवा<br>गावातील किमान ७५% कुटुंबांची कोणत्याही पध्दतीने शौचालय व्यवस्था केली असल्यास - ५ गुण, हा आकडा किमान ५०% असल्यास - ३ गुण<br>(टीप :- ५०% पेक्षा कमी कुटुंबाकडे शौचालय व्यवस्था असणारी गावे प्रथम फेरीतच स्पर्धेतून बाद होतील. त्यामुळे त्यांना गुण देण्याचा किंवा त्यांचा पुढील फेरीसाठी विचार करण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. अशी गांवे स्पर्धेत पुढे जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. | | |
| ब) | शाळा, कॉलेज, शैक्षणिक संस्थेत पुरेशी शौचालय व्यवस्था असल्यास (एकुण संस्थांचा विचार करुन त्या प्रमाणात गुण द्यावेत.)<br>(एकूण व्यवस्था असणा-या संस्था/ एकूण संस्था) X १ | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | गावातील शासकीय, निमशासकीय इमारती, कार्यालये, सहकारी संस्था, महिला मंडळ, युवक मंडळ यासाठी स्वतंत्र शौचालय व्यवस्था असल्यास (एकूण संस्थांचा विचार करुन त्या प्रमाणात गुण द्यावेत.)<br>(एकूण शौचालये असणा-या संस्था / एकूण संस्था) X १ | १ | |
| ड) | गावातील बाजार, एस.टी.स्टॅण्ड (गावाबाहेरील थांबा सोडून), यात्रास्थळे अशा सार्वजनिक जादा व्यक्ती येणा-या ठिकाणी शौचालये व मुतारीची व्यवस्था असल्यास | १ | |
| इ) | गामपंचायतीतील अंगणवाडीत मुलांसाठी शौचालय व्यवस्था असल्यास | १ | |
| फ) | ग्रामपंचायतीच्या व ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सर्व सदस्यांकडे वैयक्तिक शौचालयाची सोय असल्यास | १ | |
| **३.२** | **शौचालयाचा वापर, स्वच्छता, निगा व व्यवस्थापन एकूण** | **१०** | |
| अ) | वैयक्तिक व सामूहिक शौचालये प्रत्येकाने स्वच्छ व व्यवस्थित ठेवली असल्यास (१०% रॅण्डम तपासणी करावी व त्याप्रमाणात गुण द्यावेत व व्यवस्थेसाठी वापरलेल्या गुणात्मक व स्थानिक बाबी पहाव्यात) | ३ | |
| ब) | सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था व स्वच्छता (ग्रामपंचायतीकडून) | २ | |
| क) | सार्वजनिक शौचालयांना वापरासाठी दर आकारणी केली असेल व त्यातून शौचालयाची निगा राखली जात असेल तर (किंवा त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असल्यास व जमा झ ालेला कर इत्यादी पाहून गुण द्यावे.) | १ | |
| ड) | सर्व शौचालयात पाण्याची व्यवस्था योग्य व पुरेशी असल्यास (बाजूला टाके, नळ, पाऊस पाणी संकलन व्यवस्था इत्यादी पहावे) | १ | |
| इ) | शौचालये, जलस्त्रोत दूषित होणार नाही याची काळजी घेऊन बांधली असल्यास व तशी खात्री करुन घेतल्यास (Random तपासणी व गांवफेरीकरून) | १ | |
| फ) | मैला डोक्यावर वाहून नेण्याची पध्दत बंद असून गावातील एकूण वातावरणात मैल्याचा दुर्गंध येत नसल्यास | १ | |
| ग) | मैल्याचा उपयोग सोनखत म्हणून किंवा स्वयंपाकाचा गॅस इत्यादीसाठी होत असल्यास (प्रमाण पाहून गुण देणे) | १ | |
| **३.३** | **हागंदारी मुक्त ग्रामपंचायत एकूण** | **५** | |
| अ) | गावाने हागंदारी मुक्त गांव म्हणून जाहीर करुन गावाबाहेर विहित फलक लावला असल्यास व त्याप्रमाणे **गांव खरोखरीच हागंदारी मुक्त आहे** याची तपासणी चमूची पूर्ण खात्री झाली असल्यास | ३ | |
| ब) | गावांना **निर्मल ग्राम योजनेअंतर्गत पारितोषिक** प्राप्त झाले असल्यास | १ | |
| क) | गावाने उघडयावर शौचाला बसणारी व्यक्ती गावात दाखवून दिल्यास अशा गावाबाहेरील व्यक्तीला किमान रु.२० चे बक्षीस जाहीर करुन त्याची प्रसिध्दी केली असल्यास<br>(टीप: तपासणी चमूला गावात कोठेही थोडेही उघडयावर शौच दिसल्यास वरील अ,ब,क चा स्वतंत्र विचार न करता या संपूर्ण मुद्दा क्र. ३.३ करिता शून्य गुण द्यावेत व तसे तपासणी अहवालात नमूद करावे.) | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **घन कचरा व्यवस्थापन** **एकूण गुण** | २० | |
| ४.१ | **घनकचरा संकलन व्यवस्था** **एकूण** | १० | |
| अ) | कचऱ्याचा ओला व सुखा असे वर्गीकरण करुन तो घरे, दुकाने व सार्वजनिक ठिकाणे इत्यादी ठिकाणी वेगळा करण्याची पध्दत, व त्याप्रमाणे स्वतंत्रपणे साठविण्याची व्यवस्था असेल व त्याप्रमाणे तो साठविला जात आहे याची खात्री झाल्यास (एकूण व्यवस्थेचे प्रमाण पाहून गुण द्यावेत)<br>(टीप - ओला कचरा म्हणजे कुजणा-या वस्तु आणि सुखा कचरा म्हणजे न कुजणा-या वस्तु - उदा. प्लॅस्टीक,काच, धातु, रबर.) | २ | |
| ब) | कचरा वाहून नेण्यासाठी टॅक्ट्रर, बैलगाडी, घंटागाडी, स्वयंसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी अशी सातत्यपूर्ण व स्वतंत्र व्यवस्था केली असल्यास (व्यवस्थेची गुणात्मकता पाहून गुण देणे) व त्याप्रमाणे गावात नियमित कचरा उचलला जात असल्यास | २ | |
| क) | गावात कचरा पेटयांची व्यवस्था (सार्वजनिक ठिकाणी) व त्यातून कचरा खाली पडू नये म्हणून केलेली व्यवस्था, पेटीचा आकार, त्याची उपयुक्तता, ठेवण्याची जागा याची तपासणी करुन गुण द्यावेत.(५० घरांसाठी किमान एक पेटी, हे प्रमाण धरून निर्णय घ्यावा व त्याप्रमाणात गुण द्यावेत) | २ | |
| ड) | गावाबाहेर कचरा साठवणूकीसाठी स्वतंत्र व शास्त्रीय व्यवस्था केली असल्यास व त्याचा तसा वापर होत असल्यास | १ | |
| इ) | जनावरांचे गोठे, सार्वजनिक स्थळे येथील घनकच-याच्या विल्हेवाटीची व्यवस्था व त्याची गुणवत्ता (एकूण स्थळे/गोठे यांची संख्या पाहून गुण देणे) | १ | |
| फ) | गावातील १००% कचरा दररोज नियमित उचलला जातो याची खात्री पटल्यास | १ | |
| ग) | गावात प्लॅस्टीकचा वापर ग्रामसभेत अधिकृतपणे थांबविण्यात आला असून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी दिसून आल्यास | १ | |
| ४.२ | **घनकचरा प्रक्रीया व विल्हेवाट व्यवस्था** **एकूण** | ५ | |
| अ) | घरात व सार्वजनिक ठिकाणी गांडुळखत निर्मितीची व्यवस्था असल्यास (घरांचे प्रमाण पाहून गुण देणे) | १ | |
| ब) | नेडॅप व इतर पध्दतीने घनकच-याची शास्त्रशुध्द विल्हेवाट लावली जात असल्यास (संपूर्ण कच-याचा विचार करुन ज्या प्रमाणात ही व्यवस्था असेल त्या प्रमाणात गुण द्यावेत.) | २ | |
| क) | गावात स्मशानभूमीची स्वतंत्र व शास्त्रशुध्द व्यवस्था असल्यास | १ | |
| ड) | घनकचरा प्रक्रियेसाठी काही नाविन्यपूर्ण व शास्त्रशुध्द, स्थानिक ज्ञानावर आधारीत पध्दत ग्रामपंचायतीने अवलंबविली असल्यास (तिची परिणामकारकता पाहून गुण देणे) | १ | |
| ४.३ | **घनकचरा उपयोग** **एकूण** | ५ | |
| अ) | प्रक्रीयेद्वारे खत निर्मित करुन त्याचा खरोखरीच उपयोग होत असल्याची खात्री पटल्यास | १ | |
| ब) | गावातील उकीरडे, घनकचरा संकलन प्रक्रीया व वापर यामुळे नष्ट झाल्याने गावात काही नवे सार्वजनिक प्लॅाट उपलब्ध झाले असल्यास व त्याचा सार्वजनिक कामासाठी उपयोग होत असल्यास (सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक बागा, क्रिडांगण इत्यादीसाठी.) | २ | |
| क) | घनकच-याची प्रक्रीया करुन खतापलीकडे जाऊन कुटीरोद्योग वगैरे इतर वापर (ओला,सुका,दोन्हींचा स्वतंत्र विचार करुन) किंवा त्यातून रोजगार निर्मिती झाली असल्यास किंवा इतर उत्पादन होत असल्यास | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| इ) | घनकच-यातून मूल्यनिर्मितीमुळे ग्रापंचायतीस काही उत्पन्न मिळत असल्यास | १ | |
| **५** | **घर, गांव, परिसर स्वच्छता** **एकूण गुण** | **२०** | |
| **.१** | **गांव रंगरंगोटी, सजावट, नेटकेपणा** **एकूण** | **६** | |
| अ) | गावातील घरांची, दुकानांची व सार्वजनिक जागेतील रस्त्यावरील अतिक्रमणे नसल्यास/ विशेषत्वाने हटविली असल्यास | २ | |
| ब) | गावातील रस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसदारे याची रचना, सजावट (Random Sampling करून) | २ | |
| क) | गावातील गेट, बाग, पुतळे, शाळा, शासकीय कार्यालये यातील सजावट व नीटनेटकेपणा (एकत्रित विचार करून त्याप्रमाणे गुण देणे) | २ | |
| **.२** | **घरातील अंतर्गत व्यवस्था व नीटनेटकेपणा** **एकूण** | **९** | |
| अ) | घरातील पिण्याच्या पाण्याची व इतर वापराच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था व नीटनेटकेपणा (प्रत्यक्ष पहाणी करून व प्रश्न विचारुन सातत्य पहावे, त्याप्रमाणे गुण द्यावे) | २ | |
| ब) | घरातील स्वयंपाकगृहाची व्यवस्था, मोरीची व्यवस्था व पाण्याची विल्हेवाट व्यवस्था, स्वच्छता, नीटनेटकेपणा इत्यादी. (एकूण प्रमाण पाहून त्याप्रमाणात गुण द्यावेत) | २ | |
| क | घरातील अन्न-धान्य साठवणूक व शिजवलेले अन्न यांचे व्यवस्थापन (पहाणी व प्रश्न विचारून गुण द्यावेत) | १ | |
| ड) | कपडे धुण्याची, भांडी-कुंडी घासण्याची व्यवस्था | १ | |
| इ) | घरातील धुणे व भांडी-कुंडी यांची व्यवस्था (कपडे वापर, भांडी वापर, भांडी निगा व मांडणी) | १ | |
| फ) | घरातील वैयक्तिक शोषखड्डे, स्वयंपाक घरातील व न्हाणी घरातील पाण्याचा कुटुंबस्तरावर पुनर्वापर व शास्त्रशुध्द विल्हेवाट व्यवस्था (शोषखड्डे स्तर, निगा, बांधकाम इ.) | १ | |
| ग) | गुरांच्या गोठयातील सांडपाणी, घनकचरा यांची वैयक्तिक कुटुंब स्तरावर विल्हेवाट व व्यवस्थापन (घरातील गोठे व गावातील स्वतंत्र गोठे या दोहोचा विचार करावा) | १ | |
| **५.३** | **गाव व घरसंलग्न इतर बाबींची व्यवस्था** **एकुण** | **५** | |
| अ) | गुरेढोरे, कोंबडया, कुत्री इत्यादी जनावरांची गावातील शास्त्रशुध्द व्यवस्था ( लसीकरण, देखभाल इ.) | १ | |
| ब) | गावातील गोठयांची/ खुराडयांची व्यवस्था व नीटनेटकेपणा | १ | |
| क) | वृक्षारोपण (गाव वस्ती अंतर्गत) (एकूण कुटुंब, लोकसंख्या, जागेचा वापर, झाडे जीवंत असण्याचे प्रमाण पाहून गुण द्यावेत) | १ | |
| ड) | सार्वजनिक व वैयक्तिक परसबागांची व्यवस्था (विविधता इ.) | १ | |
| इ) | शाळा, वसतिगृहे, उपहारगृहे येथील अन्नपदार्थ हाताळणी व व्यवस्था | १ | |
| **६** | **वैयक्तिक स्वच्छता** **एकूण गुण** | **१०** | |
| अ) | शाळकरी, अंगणवाडीतील मुला मुलींची नखे, केस, गणवेश, कपडे, आंघोळ इत्यादीबाबतचा स्तर (Random sampling पध्दतीने) तपासून त्याप्रमाणात गुण देणे. | २ | |
| ब) | मुलांमध्ये (प्राथमिक शाळा, अंगणवाडी) अस्वच्छतेमुळे होणारे रोगांचे प्रमाण (खरुज, जंत) (प्रत्यक्ष पाहणी व शालेय आरोग्य रेकॉर्ड पाहून ठरविणे व त्याप्रमाणात गुण देणे) | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | गावातील महिला,युवक,युवती,विद्यार्थी,वृध्द गृहस्थ यांच्या पिण्याच्या पाणी घेण्याच्या सवयी व सातत्यपूर्ण व्यवस्था (प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती इत्यादीव्दारे तपासून गुण द्यावेत) | ५ | |
| ड) | शौचानंतर, जेवणापूर्वी व जेवणानंतर हात धुण्याच्या सवयीचे प्रमाण (चर्चा, मुलाखत, प्रत्यक्ष पाहणी आदीतून ) (हात कशाने धुतात ते पाहणे. याबाबत गावाने पूर्वी सर्वेक्षण केले असल्यास तो अहवालही विचारात घेणे) | २ | |
| इ) | गावात/घरात/शाळेत/सरकारी कार्यालये कुठेही थुंकणे, पिचकारणे असे प्रकार न दिसणे, थुंकण्याची व्यवस्था इत्यादी असणे (एकूण सवय तपासून त्याचा सार्वजनिक स्तर पाहून निर्णय घेणे) | २ | |
| फ) | घरात,रुग्णालयात रुग्णांची व्यवस्था व स्वच्छता हाताळणी पध्दत<br>(गावक-यांना याबाबत किमान माहिती आहे काय याचा चर्चा, प्रश्न आदीतून अंदाज घेवून गुण देणे) | १ | |
| **७** | **शैक्षणिक, आरोग्य,लोकशिक्षण व स्तर एकूण गुण** | **१०** | |
| अ) | गावातील प्राथमिक, पूर्व प्राथमिक सर्व शाळेत जाणारी मुले, मुली यांचे शाळेत जाण्याचे प्रमाण (गळतीचे प्रमाण पहावे.)<br>१००% - २ गुण<br>९०% - १ गुण<br>८९% व त्यापेक्षा कमी - ० गुण | २ | |
| ब) | गावातील न्यूट्रीशनचा (Nutrition) स्तर (अंगणवाडी रेकॉर्ड, प्राथमिक शाळा, विद्यार्थी Random पध्दतीने तपासून)<br>३ व ४ वर्गवारीत एकही मूल नसल्यास - १ गुण<br>गर्भवतीची काळजी - १ गुण<br>(योग्य आहार दिला जातो, गर्भकाळातील आवश्यक तपासण्या नियमित करण्यात येतात, शिशुसंगोपन माहिती दिली आहे इत्यादी.)<br>(प्रशिक्षित दाई व ANM कडून माहिती घेणे) | २ | |
| क) | सुरक्षित प्रसुतीचे प्रमाण - गावातील सर्व बाळंतपणे प्रशिक्षित दाई/प्रा.आ.केंद्र/रूग्णालयात झाल्याचे तपासणे (आरोग्य सेविकेकडून कींवा दवाखान्यातील गावातील बाळंतपणे इत्यादी रेकॉर्ड तपासून गुण देणे)<br>१००% - १ गुण<br>७५ % - १/२ गुण<br>७५ % पेक्षा कमी - ० गुण | १ | |
| ड) | स्तनपानाचे प्रमाण (आरोग्य सेविकेकडील रेकॉर्ड तपासून निर्णय घेणे) | १ | |
| इ) | अर्भक मृत्यू प्रमाण.<br>राज्य प्रमाणापेक्षा कमी - १ गुण<br>राज्य प्रमाणाऐवढे- १/२ गुण<br>राज्य प्रमाणापेक्षा जास्त - ० गुण | १ | |
| फ) | गावातील लसीकरणाचे प्रमाण<br>१००% - १ गुण<br>६० % पेक्षा जास्त - १/२ गुण<br>६० % पेक्षा कमी - ० गुण | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ग) | गावातील महिला,मुली व युवकांचा एकूण आरोग्य स्तर (प्रा.आ.केंद्राकडील रेकॉर्ड व प्रत्यक्ष पहाणी वरून) | १ | |
| ह) | गावात स्वतंत्र वाचनालये, माहितीकेंद्रे आणि समाजमंदिर यांची व्यवस्था असल्यास | १ | |
| **८** | **अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत एकूण गुण** | **१५** | |
| अ) | वृक्षतोडबंदी, कु-हाड बंदी यांची गावात प्रभावी अंमलबजावणी होत असल्यास (निरीक्षण, चर्चा, प्रश्न विचारून गुण देणे) | २ | |
| ब) | गावातील सार्वजनिक जागा (शाळा, ग्रामपंचायत) व घरासभोवती वाढलेल्या संबंधित वृक्षांचे प्रमाण,प्रकार व संवर्धन व्यवस्था (किमान १ कुटुंब १ झाड दरवर्षी लावल्यास) व शेतात काही विशेष जळावू लाकूड उपलब्ध होणा-या वृक्षांची सामुहिक व्यवस्था केली असल्यास) (झाडांचे प्रमाण व कुटुंब संख्या पाहून गुण देणे) | २ | |
| क) | गावातील सुधारीत चूल व्यवस्था (घर संख्येनुसार)<br>१००% - २ गुण<br>७५% - १ गुण<br>५०% - १/२ गुण<br>५०% पेक्षा कमी - ० गुण | २ | |
| ड) | गावातील गोबर गॅस (एकूण संख्या, चालू असलेले, वापर, स्वच्छता व निगा पाहून त्या प्रमाणात गुण देणे)<br>५०% घरात - २ गुण<br>२५% घरात - १ गुण<br>२५% पेक्षा कमी - ० गुण | २ | |
| इ) | शौचालयाचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर<br>२५%पेक्षा जास्त घरात - २ गुण<br>१०% पेक्षा जास्त घरात - १ गुण<br>१०% पेक्षा कमी घरात - ० गुण | २ | |
| फ) | सौरऊर्जा, पवनऊर्जा यांचा वापर (सार्वजनिक) | २ | |
| ग) | इतर अपारंपारिक स्त्रोतांचा वापर (गावाने स्वतः शोधलेले) | १ | |
| ह) | घरगुती दिवे, सोलर कुकर इत्यादींचा घरगुती वापर<br>४०%पेक्षा जास्त कुटुंबात - २ गुण<br>२०% पेक्षा जास्त कुटुंबात - १ गुण<br>२०% पेक्षा कमी कुटुंबात - ० गुण | २ | |
| **९** | **कुटुंब कल्याण कार्यक्रम एकूण गुण** | **२०** | |
| **९.१** | **गावातील एकूण पात्र जोडप्यापैकी कुटुंब नियोजन केलेली जोडपी एकुण**<br>५० टक्यापेक्षा कमी ० गुण<br>५१ ते ६० टक्के १ गुण<br>६१ ते ७५ टक्के २ गुण<br>७६ ते ९० टक्के ३ गुण<br>९१ ते ९९ टक्के ४ गुण<br>१०० टक्के ५ गुण | ५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९.२ | **कुटुंब नियोजनाचा प्रभावीपणा** **एकूण** | **१०** | |
| अ) | २ अपत्यावर कुटुंब नियोजन (कुटुंब नियोजन केलेल्या कुटुंबाशी टक्केवारी काढून)<br>२५ टक्कयापेक्षा कमी ० गुण<br>२५ ते ४९ टक्के २ गुण<br>५० ते ७४ टक्के ३ गुण<br>७५ ते १०० टक्के ४ गुण | ४ | |
| ब) | १ अपत्यावर कुटुंब नियोजन (कुटुंब नियोजन केलेल्या कुटुंबाशी टक्केवारी काढून त्यापैकी )<br>२० ते ४० टक्के १ गुण<br>४१ ते ७४ टक्के २ गुण<br>७५ टक्के ते १०० टक्के ३ गुण | ३ | |
| क) | २१ वर्षाखालील मुलांचा एकही विवाह झाला नसल्यास - १ गुण<br>१८ वर्षाखालील मुलींचा एकही विवाह झाला नसल्यास - २ गुण<br>१८ वर्षाखालील मुलीचा व २१ वर्षाखालील मुलाचा एकही विवाह झालेला नसल्यास -३ गुण, | ३ | |
| ९.३ | **लोकसंख्या वाढीचे प्रमाण** **एकूण**<br>अ) राज्यापेक्षा जास्त टक्केवारी - ० गुण<br>ब) राज्याएवढे टक्केवारी - १ गुण<br>क) राज्यापेक्षा ३% पर्यंत कमी - २ गुण<br>ड) राज्यापेक्षा ५% पर्यंत कमी - ३ गुण<br>इ) राज्यापेक्षा ५% जास्त फरकाने कमी - ५ गुण | ५ | |
| **१०** | **लोकसहभाग** **एकूण गुण** | **२५** | |
| अ) | महिलांचा सहभाग (परस्पर सहकार्य,सार्वजनिक उपक्रमात सहभाग) | १ | |
| ब) | युवक, युवती सहभाग (महिला मंडळ, युवती मंडळ यांचे विधायक काम) | १ | |
| क) | विद्यार्थी सहभाग (शाळा, कॉलेजेस, युवक मंडळे, गावातील विविध सामाजिक कार्यक्रम,सोस्कृतिक सहभाग) | १ | |
| ड) | संस्थात्मक सहभाग (सहकारी संस्था, सेवाभावी संस्था, महिला मंडळे) | १ | |
| इ) | गावाने एक गांव एक सार्वजनिक गणपती ही संकल्पना राबविली असल्यास | १ | |
| ई) | गावातील गणपती/गौरी/नवरात्र तसेच असे अन्य उत्सव इ.सर्व प्रकारच्या धार्मिक कार्यातील मुर्तीचे विसर्जन जलस्त्रोत प्रदुषित न करता विशेष व्यवस्था करून केले असल्यास | १ | |
| फ) | सार्वजनिक उत्सव तसेच घराघरातील निर्माल्य विसर्जनाने परिसर/जलस्त्रोत प्रदुषित न करता त्यापासून खत बनविण्यात अथवा इतर मूल्यनिर्मितीसाठी उपयोग करण्यात येत असल्यास | १ | |
| ग) | गावात गत ३ वर्षात फौजदारी गुन्हा दखलपात्र अशी एकही घटना घडली नसल्यास व तसा पोलीस दाखला असल्यास | १ | |
| ह) | गावात गुटखाबंदी व दारुबंदीची १०० टक्के अंमलबजावणी असल्यास | २ | |
| ज) | शासनाने नेमून दिलेल्या सर्व समित्या गावात अस्तित्वात असून त्यात नेमून दिलेल्या प्रमाणात महिला व मागासवर्गीयांचा समावेश असल्यास व त्या सक्रिय कार्यरत असल्यास (चर्चा,मुलाखती, कार्यालय भेटी, दप्तर पहाणी यातून निर्णय घ्यावा.) | २ | |

| | | | |
|---|---|---|---|
| त) | गावातील मागासवर्गीयांच्या, अदिवासींच्या व महिलांच्या उन्नतीसाठी शासकीय योजनाव्यतिरीक्त गावाने काही खास सामुहिक प्रयत्न केले असल्यास | १ | |
| थ) | गावात नमून दिलेल्या तारखेस ग्रामसभा व त्याआधी महिला ग्रामसभा यांचे आयोजन केले असल्यास (वर्षात किमान ६ वेळा) | १ | |
| द) | एकजुटीमुळे गावातील सर्व अतिक्रमणे हटविली गेली असल्यास व यासाठी गावातील एकही केस कोर्टात नसल्यास व गावातील सार्वजनिक जागा सार्वजनिक बाबींसाठीच वापरल्या जात असल्यास | २ | |
| ध) | गावाने स्वयंरोजगार निर्मितीसाठी केलेले प्रयत्न-खालील मुद्यांचा विचार करून गुण देण्यात यावेत.<br>अ) किती बेरोजगारांना रोजगार मिळाला ?<br>ब) किती कुटुंबे स्वयंपूर्ण झाली ?<br>क) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण किती कमी झाले? | ३ | |
| य) | गावाने सामुदायिक विकासासाठी अभिनव कल्पना राबविली असल्यास (स्वयंसहाय्यता गटाची कामे, शाळा,मंडळे यांनी पुढाकाराने केलेली कामे) | २ | |
| र) | गावाने विकासाची जास्तीत जास्त कामे लोकसहभागातून, लोकवर्गणीतून केली असल्यास (शाळा ग्रामपंचायत/रस्ते/ जलसंधारण कामे) | २ | |
| ल) | ग्रामपंचायत निवडणुका . एकमताने अविरोध झाल्या असल्यास | १ | |
| व) | गावातील तंटे गावातच सोडविण्याची यंत्रणा व कोर्टात दिवाणी दावे नगण्य असल्यास | १ | |
| **११** | **वैयक्तिक व सामुहिक पुढाकारातून गावविकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम**<br>**एकूण गुण** | ५ | |
| अ) | ग्रामोपयोगी शेती/कुटीरोद्योगासाठी अथवा तत्सम ग्रामीण गरजांसाठी आवश्यक बी-बियाणे अवजारे इत्यादी यांचा शोध, सुधारणा व नाविन्यपूर्ण उपक्रम वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर राबविले असल्यास व त्याला अधिकृत मान्यता मिळाली असल्यास | १ | |
| ब) | गावाला/गावातील व्यक्तींना विशेष कामगिरीबद्दल राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर पारितोषिक/प्रमाणपत्र/सन्मानपत्र मिळाले असल्यास | १ | |
| क) | गावाने शेती उत्पन्नात, सिंचन वापरात, पिक नियोजनात, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रात, क्रिवा अशा तत्सम ग्राम विकासाच्या क्षेत्रात वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर भरीव व वाखाणण्याजोगी कामगिरी केली असल्यास व त्याची दखल राज्य, राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली असल्यास | १ | |
| ड) | तपासणी चमूला वरील शिवाय इतर क्षेत्रात गावाने राबविलेल्या व त्यांनी नमूद केलेल्या इतर उपक्रमात काही विशेष व नाविन्यपूर्ण बाबी आढळून आल्यास (गुण देताना अहवालात सर्व बाबी विशेषत्वाने नमूद कराव्यात) | २ | |
| | **एकूण सर्व** | **२००** | |

# मुलाखत अनुसूची

# ग्रामस्वच्छता अभियानातील महिलांचा सहभाग आणि त्याचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील दोन निवडक गावांचा अभ्यास

गाव : कोरेगाव / शेळकेवाडी अनुसूची क्रमांक :

## मुलाखत अनुसूची

१. मुलाखत दाराचे नाव : ______________________

२. वय : वर्षे

३. वैवाहिक दर्जा : १) अविवाहित २) विवाहित ३) इतर ☐

४. धर्म : १) हिंदू २) जैन ३) बौद्ध ४) मुस्लिम ५) इतर ☐

५. जात प्रवर्ग : १) खुला २) अ.जा. ३) अ.ज. ४) एन.टी. ५) ओबीसी ६) इतर ☐

६. शिक्षण : १) अशिक्षित २) प्राथमिक ३) माध्यमिक ४) उच्च माध्यमिक ५) पदवीधर ६) पदव्युत्तर ७) इतर ☐

७. कुटुंबाचा प्रकार : १) विभक्त २) संयुक्त ☐

८. स्वत:चा व्यवसाय :१) गृहीणी, २) गृहिणी व स्वत:ची शेती , ३) गृहिणी व शेतमजूर, ४) गृहिणी व स्वयंरोजगार, ५) इतर ☐

९. कुटुंबातील एकूण व्यक्तींची संख्या

अ) एकूण संख्या ☐ ब) पुरूष ☐ स्त्रीया ☐

क) शाळेत जाणाऱ्यांची संख्या - मुले ☐ मुली ☐

ड) ६ वर्षाखालील - मुले ☐ मुली ☐

१०. १ ऑक्टोबर रोजी गावात अभियानासंबंधी महिला ग्रामसभा बोलावण्यात आली होती, त्यात तुम्ही सहभाग घेतला होता का?

होय ☐ नाही ☐

११. 'होय' असल्यास, या महिला ग्रामसभेत कशावर चर्चा झाली?

------------------------------------------------------------

१२. २ ऑक्टोबर रोजी गावात अभियानासंबंधी ग्रामसभा बोलावण्यात आली होती, त्या सदर सभेत तुम्ही सहभाग घेतला होता ?

होय ☐ नाही ☐

१३. होय असल्यास या ग्रामसभेत काय करण्याचे ठरले?

------------------------------------------------------------------------

१४. ३ व ४ ऑक्टोबर रोजी गावात राबविलेल्या ग्रामसफाई व कचरा मुक्ती जागृती मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

१५. 'होय' असल्यास त्या मोहिमेअंतर्गत कोणकोणती कामे तुम्ही स्वत: केली?

------------------------------------------------------------------------

१६. अभियानापूर्वी तुमच्या घरात कचरा कुंडी होती काय?

होय ☐ नाही ☐

१७. सध्या तुमच्या घरात कचरा कुंडी आहे काय?

होय ☐ नाही ☐

१८. सध्या आपल्या घरातील कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते?

१) नेडॅपसाठी ☐ २) कंपोस्ट खतासाठी ☐

३) इतर ☐

१९. तुमच्या घराच्या आजूबाजूच्या परिसरात कचरा टाकल्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते काय?

होय ☐ नाही ☐

२०. ५ व ६ ऑक्टोबर रोजी शोषखड्ड्याची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहिमेत आपला स्वत:चा सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

२१. शोषखड्ड्याची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहिमेअंतर्गत आपण स्वत: कोणते काम केले होते?

------------------------------------------------------------------------

२२. ७ व ८ ऑक्टोबर रोजी शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिमेत आपला स्वत:चा सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

२३. सहभाग असल्यास शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता मोहिमेत आपण स्वत: कोणते काम केले होते?

------------------------------------------------------------------------

२४. ९ व १० ऑक्टोबर रोजी घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

२५. स्वत:चे घर व परिसर स्वच्छ राहण्यासाठी आपण कोणती कामे केली?

-----------------------------------------------------------------------

२६. अभियान राबविण्यापूर्वी घरातील कपडे, भांडी व इतर घरातील आवश्यक वस्तू व्यवस्थित व नीटनेटकेपणा ठेवले जात होते का?

होय ☐ नाही ☐

२७. सध्या देखील आपल्या घरातील भांडी, कपडे, इतर आवश्यक वस्तू घरात व्यवस्थित लावलेल्या असतात का?

होय ☐ नाही ☐

२८. ११ व १२ ऑक्टोबर रोजी स्वच्छता विषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके कार्यक्रम झाला होता, त्यात आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

२९. सदरच्या प्रदर्शन व प्रात्यक्षिकातून आपणाला नेमकी कोणती माहिती मिळाली?

-----------------------------------------------------------------------

३०. १३ व १४ ऑक्टोबर रोजी गावात शौचालय दुरूस्ती / बांधकाम अभियान मोहिम राबविण्यात आली, त्यात सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

३१. अभियान राबविण्यापूर्वी आपल्या घरातील व्यक्ति शौचविधीसाठी कोठे जात होत्या?

-----------------------------------------------------------------------

३२. घरात संडास बांधल्यामुळे आपल्याला होणारा त्रास कमी झाला आहे काय?

होय ☐ नाही ☐

३३. सध्या तुमच्या घरी वैयक्तीक शौचालय आहे का?

होय ☐ नाही ☐

३४. उत्तर 'होय' असल्यास ते केंव्हा बांधले गेले?

-----------------------------------------------------------------------

३५. तुमच्या कुटुंबातील स्त्री-पुरूष व मुले शौचालयाचा दररोज / नियमित वापर करतात काय?

होय ☐ नाही ☐

३६. आपल्या घरगुती शौचालयाचा उपयोग स्वयंपाक गॅस तयार करण्यासाठी करता काय?

होय ☐ नाही ☐

३७. उघड्यावर शौचविधी करणाऱ्या व्यक्तीवर ग्रामपंचायतीद्वारा दंडात्मक कारवाई केली जाते काय?

होय ☐ नाही ☐

३८. १५ व १६ ऑक्टोबर रोजी गावात झालेल्या पाणी शुद्धता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिमेत आपण सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

३९. होय असल्यास पाणी शुद्धतेसंदर्भात कोणकोणते प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दाखविण्यात आले?

------------------------------------------------------------------------

४०. प्रात्यक्षिकाप्रमाणे आपण स्वत: पाणी-शुद्ध करून घरी वापरता काय?

होय ☐ नाही ☐

४१. पिण्याचे पाणी घेण्यासाठी वागराळ्याचा वापर करता का?

होय ☐ नाही ☐

४२. गेल्या चार महिन्यात दुषित पाणी व अस्वच्छतेमुळे घरातील कोणी आजारी पडले आहे काय?

होय ☐ नाही ☐

४३. आजारी पडले असल्यास आजाराचे नाव काय?

१) हगवण ☐ २) कॉलरा ☐

३) टायफाइड ☐ ४) कावीळ ☐

५) इतर ☐

४४. १७ व १८ ऑक्टोबर रोजी गावात झालेल्या वैयक्तिक स्वच्छता (नखे कापणे, स्वच्छ अंघोळ, केस धुणे, उवा निर्मूलन) मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

४५. होय असल्यास, त्या मोहिमेत कोणकोणत्या गोष्टीचे महत्त्व सांगण्यात आले?

------------------------------------------------------------------------

४६. तुम्ही स्वत: आपले व्यक्तिगत आरोग्य चांगले रहावे म्हणून कोणत्या बाबीकडे लक्ष देता?

-----------------------------------------------------------------

४७. तुम्ही आपल्या कुटुंबातील लहान मुलाचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी कशी काळजी घेता?

-----------------------------------------------------------------

४८. १९ व २० ऑक्टोबर रोजी गावात झालेल्या रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहिमेत आपला स्वत:चा सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

४९. होय असल्यास या मोहिमेअंतर्गत तुम्ही स्वत: कोणकोणती कामे केली?

-----------------------------------------------------------------

५०. २१ व २२ ऑक्टोबर रोजी गावात जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा या उपक्रमात आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

५१. आपल्या घरी गाय, म्हैस, बैल, शेळ्या इ. जनावरे आहेत काय?

होय ☐ नाही ☐

५२. जनावरे स्वच्छता मोहिम व आदर्श गोठा स्पर्धेमुळे कोणता फायदा झाला आहे? असे तुम्हास वाटते.

-----------------------------------------------------------------

५३. २३ व २४ ऑक्टोबर : वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

५४. आपली स्वत:ची परसबाग आहे का?

होय ☐ नाही ☐

५५. घराभोवती / परसबागेत फुलझाडांचा व औषधी वनस्पतीचा समावेश आहे का?

होय ☐ नाही ☐

५६. होय असल्यास कोणकोणती फुलझाडे व औषधी वनस्पती आहेत?

-----------------------------------------------------------------

५७. स्वयंपाक करताना धुराचा त्रास होतो काय?

होय ☐ नाही ☐

५८. स्वयंपाकासाठी खालीलपैकी कशाचा वापर करता?

१) सिलेंडर गॅस ☐ २) बायोगॅस ☐

३) स्टोव्ह ☐ ४) निर्धुर चुल ☐

५) चूल ☐ ६) इतर ☐

५९. सौर चुलीचा वापर आपण करता काय?

होय ☐ नाही ☐

६०. घरात सौर ऊर्जेचा वापर आपण करता काय?

होय ☐ नाही ☐

६१. २५ व २६ ऑक्टोबर रोजी गावात घेतलेल्या स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

६२. आपल्या घरातील काही व्यक्ती व्यसनी आहेत काय?

होय ☐ नाही ☐

६३. असल्यास किती व्यक्ती व त्यांना कोणती व्यसने आहेत?

--------------------------------------------------------------------

६४. व्यसनमुक्तीसाठी तुम्ही कोणते प्रयत्न केले आहेत?

--------------------------------------------------------------------

६५. अभियान राबविण्यापूर्वी आपल्या घरातील पुरूषांना कोणकोणती व्यसने होती?

--------------------------------------------------------------------

६६. अभियान राबविल्यामुळे आपल्या घरातील पुरूषांनी व्यसने सोडून दिली आहेत काय?

होय ☐ नाही ☐

६७. सदृढ बालक स्पर्धा, माता बाल संगोपन रोगनिदान व साथी रोग प्रतिबंध मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

६८. सदृढ बालक स्पर्धा, माता बाल संगोपन यामुळे तुम्हाला कोणता लाभ झाला?

-----------------------------------------------------------------

६९. प्रसूतीवेळी तज्ञ आया किंवा डॉक्टर यांची मदत घेतली जाते काय?

होय ☐ नाही ☐

७०. डासाचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी आपण कोणती काळजी घेता?

-----------------------------------------------------------------

७१. २९ व ३० ऑक्टोबर रोजी गावात गटारे सांडपाणी निर्मुलन, सांडपाणी वापर मोहिमेत आपला सहभाग घेता का?

होय ☐ नाही ☐

७२. अभियान राबविण्यापूर्वी आपण घरातील सांडपाण्याचे नियोजन, योग्य रितीने केले होते काय?

होय ☐ नाही ☐

७३. तुमच्या घराजवळील गटारीची नियिमित स्वच्छता केली जाते काय?

होय ☐ नाही ☐

७४. तुम्ही घरातील सांडपाण्याचा वापर कशापद्धतीने केला आहे?

| | | | |
|---|---|---|---|
| १) परसबागेला | ☐ | २) शोषखड्ड्यात सोडले आहे | ☐ |
| ३) ओढ्याला सोडले आहे | ☐ | ४) सांडपाणी संकलनात सोडले आहे | ☐ |
| ५) कुठे जागा असेल तेथे सोडले आहे | ☐ | ६) इतर | ☐ |

७५. ३१ ऑक्टोबर रोजी गावात संकल्प दिवस मोहिमेत आपला सहभाग होता का?

होय ☐ नाही ☐

७६. संकल्प दिनाच्या मोहिमेत तुम्ही कोणता संकल्प केला?

-----------------------------------------------------------------

७७. शाळेतील मुले (स्वच्छता)आरोग्यविषयक माहिती घेण्यासाठी आपल्या घरी येतात काय?

होय ☐ नाही ☐

७८. अभियान राबविण्यापूर्वी दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे आपल्या घरातील स्त्रिया आजारी पडत होत्या काय?

होय ☐ नाही ☐

७९. आजारी पडत असल्यास कोणकोणते आजार स्त्रियांना होत होते?

---------------------------------------------------------------------

८०. अभियानानंतर साथीचे व पाण्यासंबंधीत आजार कमी झाले आहेत असे आपल्याला वाटते काय?

होय ☐ नाही ☐

८१. अभियान राबविल्यामुळे बालविवाह व हुंडा पद्धत अशा अनिष्ठ प्रथांना यापुढे आळा बसेल असे आपणाला वाटते काय?

होय ☐ नाही ☐

८२. अभियान राबविण्यापूर्वी गावात महिला मंडळ व बचतगट होते का?

होय ☐ नाही ☐

८३. आपण महिला मंडळ व बचत गटाचे सभासद आहात का?

होय ☐ नाही ☐

८४. अभियानात महिला मंडळाने कोणती कामे केली?

---------------------------------------------------------------------

८५. महिला मंडळ व बचत गट यामुळे स्त्रीयांना आर्थिक लाभ व रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत काय?

होय ☐ नाही ☐

८६. अभियान राबविण्यापूर्वी आपल्या घरी स्वयंपाकासाठी निर्धुर चुलींचा वापर होत होता का?

होय ☐ नाही ☐

८७. अभियानानंतर आपल्या घरी स्वयंपाकासाठी निर्धुर चुलींचा वापर होतो काय?

होय ☐ नाही ☐

८८. ग्राम स्वच्छता अभियानामुळे महिलांना कोणकोणते फायदे झाले असे तुम्हाला वाटते?

---------------------------------------------------------------------

८९. आपल्या मते स्पर्धेच्या वेळी झालेल्या तपासणीच्या वेळी आपला गाव जेवढा स्वच्छ व सुंदर होता तेवढीच स्वच्छता त्यानंतरही टिकून आहे काय?

---------------------------------------------------------------------

## अभियानात सहभागी होण्यापूर्वीची, अभियान काळातील आणि सध्याची स्थिती : स्त्रियांची निरीक्षणे

| अ. क्र. | बाबत | अभियानापूर्वीची स्थिती | अभियानकाळातील स्थिती | सद्याची स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | गावांतील रस्त्यांचे स्वरुप | | | |
| २. | गावांतील रस्त्यांची स्वच्छता | | | |
| ३. | गावांतील गटारींची स्थिती | | | |
| ४. | घरगुती कचऱ्याची विल्हेवाट | | | |
| ५. | गावांतील सांडपाणी व्यवस्थापन | | | |
| ६. | गावांत सौरऊर्जेचा वापर | | | |
| ७. | पिण्याचे पाणी : स्वच्छता व उपलब्धता | | | |
| ८. | शौचालयाचा वापर | | | |
| ९. | निर्धुर चुलींचा वापर | | | |
| १०. | गावांतील व्यसनाधीनता | | | |
| ११. | जनावरांची व गोठ्याची स्वच्छता | | | |
| १२. | गांडूळ खत प्रकल्प | | | |
| १३. | गप्पी मासे पैदास केंद्र | | | |
| १४. | ऑक्सिजन पार्क | | | |
| १५. | व्यक्तिगत आरोग्यविषयक जाणीव | | | |
| १६. | परिसर स्वच्छतेविषयीची जाणीव | | | |
| १७. | संस्कार वाहिनीचा वापर | | | |
| १८. | गावातील ऐक्य | | | |
| १९. | कुऱ्हाड बंदी / वृक्षतोडबंदी | | | |

## कुंटुंबातील व्यक्तींचा ग्रामस्वच्छता अभियानातील सहभाग दर्शविणारा तक्ता

**कुंटुंबातील एकूण व्यक्तींची संख्या ..............**

| अ. क्र. | तारीख | उपक्रम | सहभागी व्यक्तींची संख्या | | | सहभागाचे स्वरुप | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | उपस्थिती | सक्रीय सहभाग |
| १. | २ ऑक्टोबर | अभियानासंबंधी ग्रामसभा | | | | | |
| २. | ३ व ४ ऑक्टों. | ग्रामसफाई व कचरामुक्ती दिवस | | | | | |
| ३. | ५ ते ६ ऑक्टों | शोषखड्डे स्वच्छता व बांधकाम दिवस | | | | | |
| ४. | ७ ते ८ ऑक्टों. | शाळा व सार्व. इमारती स्वच्छता दिवस | | | | | |
| ५. | ९ व १० ऑक्टों. | घर व परिसर स्वच्छता दिवस | | | | | |
| ६. | ११ व १२ ऑक्टों. | स्वच्छता विषयक साहित्य प्रदर्शन व तांत्रिक ज्ञानाबाबतचा अभियान दिवस | | | | | |
| ७. | १३ व १४ ऑक्टों. | शौचालय दुरुस्ती/बांधकाम मोहीम | | | | | |
| ८. | १५ ते १५ ऑक्टों. | पाणी शुध्दता, प्रात्यशिक्षक व प्रशिक्षण दिवस | | | | | |
| ९. | १७ ते १८ ऑक्टों. | वैयक्तिक स्वच्छता दिवस | | | | | |
| १०. | १९ ते २० ऑक्टों. | रस्ते दुरुस्ती व श्रमदान दिवस | | | | | |
| ११. | २१ व २२ ऑक्टों. | जनावरे स्वच्छता मोहिम दिवस | | | | | |
| १२. | २३ ते २४ ऑक्टों. | वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपारीक उर्जा दिवस | | | | | |
| १३. | २५ ते २६ ऑक्टों. | गावात स्लोगन, निबंध स्पर्धा, व्यसन मुक्ती दिवस | | | | | |
| १४. | २७ ते २८ ऑक्टों. | सदृढ बालक स्पर्धा, मातांची तपासणी, लसीकरण इ. | | | | | |
| १५. | २९ ते ३० ऑक्टों. | सांडपाणी निर्मुलन, सांडपाण्याचा पुनर्वापर दिवस | | | | | |
| १६. | ३१ ऑक्टों. | संकल्प दिवस | | | | | |